# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २२/०५/२०१२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २२/०५/२०१२ रोजी सभा सुचना क्र. ५ दि. १७/०५/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ५. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ६. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ७. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| ८. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ९. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १०. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| ११. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |
| १२. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १३. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| १४. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १५. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |
| १६. | श्री. मोहन जाधव | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. २२/०५/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५, दि. १७/०५/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. २९, दि. १३/०४/२०१२, दि. २३/०४/२०१२ व दि. ०८/०५/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**भगवती शर्मा :-**

दि. १३/०४/२०१२, दि. २३/०४/२०१२ व दि. ०८/०५/२०१२ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २९ :-**

दि. १३/०४/२०१२, दि. २३/०४/२०१२ व दि. ०८/०५/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २८ :-**

दि. १३/०४/२०१२, दि. २३/०४/२०१२ व दि. ०८/०५/२०१२ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा      अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ३०, निविदेस मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग) मिरा भाईंदर शहरातील भुयारी गटार योजनेतील सांडपाण्यावरील पूर्नप्रक्रिया शुध्दीकरण केंद्र बांधणे त्याची वितरण व्यवस्था व पुढील तीन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर शहरासाठी JNNURM अंतर्गत भुयारी गटार योजनेस केंद्र शासनाने दि. ०६/१२/२००७ रोजी ३३१.४२ कोटी एवढया रक्कमेस मान्यता दिलेली आहे. योजनेमध्ये सांडपाण्याचा पुर्नवापर करणेच्या Reforms चा अंतर्भाव आहे. सांडपाण्यावरील पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर करणेबाबतचा रिफॉर्म शासनाने महानगरपालिकेस बंधनकारक केलेला आहे. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करुन वितरण व्यवस्था अंथरणेच्या रु.२३.७७ कोटी किंमतीच्या कामास निविदा काढणेस मा. महासभेने दि.११/११/२०११ रोजी ठराव क्र. ८० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सांडपाण्याचा पुर्नवापर करणे अशाप्रकारचे काम आजपावेतो कुठेही केलेले नसून कामाचा सुध्दा अनुभव नाही. त्यामुळे सदर कामासाठी तांत्रिक मार्गदर्शन करणेकरिता डॉ. राकेश कुमार, वरीष्ठ शास्त्रज्ञ, NEERI, मुंबई, डॉ.ज्योतीप्रकाश, प्रोफेसर स्थापत्य विभाग, आय.आय.टी. मुंबई, डॉ. आर.एस.जांगीड, प्रोफेसर, स्थापत्य विभाग, आय.आय.टी. मुंबई यांची तांत्रिक सल्लागार समिती नेमण्यात आलेली आहे.

सांडपाण्याचा पुर्नवापर बांधकामासाठी, बगीचा, रस्ते धुणे व सार्वजनिक शौचालयासाठी प्रस्तावित आहे. व पुर्नवापराचा प्रकल्प उभारणी टप्प्याटप्प्याने करण्याच्या दृष्टीने प्रथमतः ५ द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचा पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर प्रकल्प JNNURM अंतर्गत उभारणेच्या कामाच्या रु.११,४५,०१,९५०/- एवढया रक्कमेची निविदा सुचना दि.१८/०२/२०१२ रोजी दै. लोकमत, दै. लोकसत्ता व फ्रिप्रेस जर्नल या वृत्तपत्रात देण्यात आल्या असून e-Tendering द्वारे निविदा मागविण्यात आलेल्या होत्या व सदर निविदा e-Tendering द्वारे भरण्याची अंतिम मुदत दि.१९/०३/२०१२ दुपारी १२.०० वाजेपर्यंत होती. निविदा भरण्याची अंतिम तारीख दोन वेळेस वाढविण्यात येऊन दि. ०७/०४/२०१२ दुपारी १२.०० वाजेपर्यंत करण्यात आली होती. या दरम्यान ३ निविदा आलेल्या होत्या. M/s Thermax Ltd, M/s Kirloskar Brothers Ltd, व M/s Deccan Water Treatment Pvt. Ltd. यांनी निविदा भरलेल्या आहेत. सदरील तीनही निविदाकारांचे Technical Bid दि. १२/०४/२०१२ रोजी उघडण्यात आल्या. योजनेचे सल्लागार M/s Tandon Associates यांनी सदर Technical bid चे evaluation केले आहे. तीनही निविदाकारांचे Technical bid योग्य असून टेकनॉलॉजी व प्रोसेस वर निविदेच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या अनुमती (Apprisal) नंतर तीघांचेही Financial bid उघडण्याची शिफारस योजनेचे सल्लागार M/s Tandon & Associates यांनी केलेली आहे. निविदेच्या तांत्रिक सल्लागार समितीने तीनीही निविदाकारांच्या टेक्नॉलॉजी व प्रोसेस ट्रिटमेंट अभ्यासून त्यांनी प्रस्तावित केलेली टेक्नॉलॉजी व प्रोसेस ट्रिटमेंट योग्य असल्याचा अहवाल दिलेला असून मिरा भाईंदर महानगरपालिकेस निविदेची पुढील कार्यवाही करण्याची शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे सदरील तीनही निविदाकारांचे Financial Bid दि.१४/०५/२०१२ रोजी उघडण्यात आले. त्यांनी सादर केलेले देकार खालीलप्रमाणे आहेत.

| | Cost put to tender –Rs. 11,45,01,950 | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr.No** | **Agency** | **Rate** | **Cost** | **Remarks** |
| 1 | M/s Thermax Ltd | 22 % above | Rs. 13,96,92,379.00 | 1st Lowest |
| 2 | M/s Kirloskar Brothers Ltd. | 49 % above | Rs. 17,06,03,905.50 | 2nd Lowest |
| 3 | M/s Deccan Water Treatment Pvt.Ltd. | 63 % above | Rs. 18,66,38,178.50 | 3rd Lowest |

वरीलप्रमाणे M/s Thermax Ltd, Pune यांचा देकार लघुत्तम असल्याने त्यांना त्यांचा देकाराचे Justification व दर कमी करणेबाबत पत्र दिलेले आहे. त्यानुसार M/s Thermax Ltd, Pune यांनी त्यांच्या देकाराचे Justification सादर केलेले आहे. तसेच याच प्रकारची कामे भविष्यात निघण्याची शक्यता असल्यामुळे त्यांनी त्यांचा अंतिम देकार २२ % वरुन ९.९८ % एवढा कमी केला आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करताना T.T.P. करिता Technology निश्चित नसल्याने वेगवेगळ्या Technology चे सरासरी दर घेऊन अंदाजपत्रक तयार केले होते. त्यावेळी देखील UF Technology वर आधारित T.T.P. चे दर सर्वात जास्त होते. तसेच महानगरपालिकेकडे T.T.P. साठी फक्त १००० चौ.मी. जागाच उपलब्ध असल्यामुळे एवढया कमी जागेत फक्त UF Technology – membrane वर आधारित T.T.P. च बसू होऊ शकतो. सदर कामासाठी T.T.P. व्यतिरिक्त इतर सर्व बाबींसाठी सन २०१०-११ चे दरसुचीनुसार दर प्रस्तावित केलेले आहेत. सदर अंदाजपत्रक सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार केले आहे. प्रचलीत दरसुचीनुसार (सन २०११-१२) अंदाज पत्रकीय किमंतीत वाढ होत आहे.

योजनेचे सल्लागार M/s Tandon & Associates यांनी M/s Thermax Ltd, Pune यांच्या Financial bid चे Evaluation करुन त्यांनी दिलेला निविदेतील किंमत रु. ११,४५,०१,९५०/- या रक्कमेवर ९.९८ % जास्त दराचा (रु.१२,५९,२९,२४५/-) अंतिम देकार सर्वात कमी व योग्य असल्याचा अहवाल दिला आहे.

निविदेतील किंमत रु. ११,४५,०१,९५०/- या रक्कमेवर ९.९८ % जास्त दराच्या (रु.१२,५९.२९,२४५) M/s Thermax Ltd, Pune यांच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यास शिफारस आहे.

तसेच सदर निविदा बाबत त्वरीत योग्य अटी व शर्तीचा करारनामा करण्यास व ठेकेदारास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच निविदेमधील अटीशर्ती व करारनाम्यातील अटीशर्ती नुसार ठेकेदारास वेळोवेळी देयके प्रदान करण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, आता हा जो ठराव झालेला आहे. पाण्याची पुर्नप्रक्रिया करुन ते उपयोगात आणते त्याच्यामध्ये जरा स्पष्टीकरण पाहिजे होतं. ५ एमएलडी पाण्यासाठी हा प्रस्ताव आहे मग सध्या आपल्याला ११६ एमएलडी पाणी या शहरामध्ये येतं ते हे ५ एमएलडी पाण्याचा वापर नक्की कुठच्या ठिकाणी करणार? आपला जो एसटीपी आहे. साधारण १६ एसटीपी आहेत. त्यातल्या कुठच्या एसटीपी मधल्या पाण्याचा पुर्नवापर करणार? आणि प्रक्रीया कशाप्रकारे करणार?

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो आपण सुरुवातीला ५ एमएलडी री-युज साठी निविदा काढलेली आहे. ती झोन नं.८ ची निविदा आहे. झोन नं.८ मधील...............

**अनिल सावंत :-**

झोन ८ मधील म्हणजे एरीया कुठचा आहे तो?

**सुरेश वाकोडे :-**

झोन ८ नंबरच्या एरीया म्हणजे घोडबंदरचा एरीया आहे सर्व्हे नं. २३३ च्या एरीयामध्ये गव्हर्नमेंट ने तो प्लॉट घेतलेला आहे त्या प्लॉट मध्ये आपण एसटीपी प्रस्तावित केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

सध्याच्या एसटीपी चं काम कुठपर्यंत आलेलं आहे.

**सुरेश वाकोडे :-**

सध्याच्या एसटीपी चं काम हे ८० टक्के पुर्ण झालेलं आहे.

**अनिल सावंत :-**

८० टक्के झालेला आहे आणि त्याच्यामध्ये कुठचा कुठचा एरीया कवर होतो.

**सुरेश वाकोडे :-**

त्याच्यामध्ये कनकीया पासुन ते काशिमिरा हा एरीया येतो मोठा एरीया येतो तो आणि ते न्यु डेव्हलपिंग झोन आहे काही ठिकाणी पाईप लाईन टाकुन काही ठिकाणी पाणी वापरता येईल. गार्डनसाठी पाणी युज करता येईल असं तो प्रोव्हिजन घेऊन आपण तो ८ नंबरचा एरीया नेमलेला आहे आणि त्यासाठी आपण काय केलं की, ट्रीटमेंट साठी आपण जी टेक्नॉलॉजी घेतलेली आहे ती चांगली दर्जाची टेक्नॉलॉजी घेतलेली आहे. यु ऑफ टेक्नॉलॉजी यु ऑफ अल्ट्रा पिटीशन घेतलेलं आहे. मेमोरीयल टेक्नॉलॉजी आहे. मेमोरीयल टेक्नॉलॉजीमुळे पाण्याची कॉलीटी फार चांगली मिळणार आहे आणि त्याचा री-युज आपण चांगल्याप्रकारे करु शकतो.

**अनिल सावंत :-**

थर्मेक्स काय करणार आहे? थर्मेक्स ची त्याच्यामध्ये भुमिका काय आहे?

**सुरेश वाकोडे :-**

थर्मेक्स ची भुमिका म्हणजे पूर्ण टेंडर तेच करणार आहे.

**अनिल सावंत :-**

पाण्याचं काय? आपल जे एसटीपी आहे प्रोसेसिंग वगैरे सर्व आपण करणार आहोत. डीस्ट्रीब्युशन व्यवस्था थर्मेक्स बघणार आहे की काय बघणार आहे?

**सुरेश वाकोडे :-**

एसटीपी प्लॉन्ट आहे त्यामध्ये संप ॲन्ड पंप हाऊस बांधणे त्याठिकाणी वरती ईएसआर बांधणे पाईप टाकणे, टँकर पॉईंट करणे ही सगळी कामे थर्मेक्स बघते.

**अनिल सावंत :-**

म्हणजे त्या एसटीपी चं थर्मेक्स पुर्ण मेंन्टेनन्स सर्वेक्षण करणार.

**सुरेश वाकोडे :-**

आणि ३ वर्षे मेंटेनन्स येते का?

**अनिल सावंत :-**

आणि त्याचं डीस्ट्रीब्युशन सिस्टम  कशी काय करणार आहे? समजा, तुम्ही गार्डन रोड वगैरे म्हणता त्याच्यासाठी त्या एंड पर्यंत अजून थर्मेक्स देणार आहे.

**सुरेश वाकोडे :-**

हो, थर्मेक्स तिथपर्यंत लाईन टाकणार आहे डीस्ट्रीब्युशन ची लाईन ते टाकणार. टँकर पॉईंट त्याठिकाणी आपण घेणार आहे. गार्डन साठी कनेक्शन घेणार आहे. डिस्ट्रीब्युशन अँन्ड पंम्पींग मशिनरी आणि ट्रीटमेंट याची देखभाल दुरुस्ती तीन वर्षे ते करणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

वाकोडे साहेब, १२कोटी रुपये हा त्याच्यामध्ये सर्विस अँन्ड मेंटेनन्स हे तीन वर्षे करीता आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझी याच्यामध्ये एक शंका आहे आपण टिप्पणी मध्ये दिली की, सांडपाण्याचा पुर्नवापर करणे अशा प्रकारची कामे आजपावेतो कुठेही केलेली नसुन कामचा सुध्दा अनुभव नाही. मग अनुभव नसताना आपण त्यांना देत असु.

**सुरेश वाकोडे :-**

सांडपाणी री-युज करणं हे एक नविन फंड आहे म्हणून त्यासाठी आपण काय केलं की, त्याच्यासाठी आपण एक तांत्रिक कमिटी नेमलेली आहे त्यामध्ये आयआयटी चे दोन प्रोफेसर आणि नेरीचे प्रोफेसर आहे. तर त्यांचा सल्ला घेऊन कशी टेक्नॉलॉजी घेतली पाहिजे? पाणी शुध्द करण्यासाठी काय केलं पाहिजे ही त्याचीं मदत घेऊन आपण टेक्नॉलॉजी फायनल केली तज्ञ लोकांकडुन आपण ती ती टेक्नॉलॉजी फायनल करुन घेतली.

**शशिकांत भोईर :-**

सर्व साधारण म्हणजे २४ करोड रुपये खेळायला लागेल म्हणजे एक प्रकारचा जुगार खेळ बोलतात ना तो जुगार खेळला आणि जुगारामध्ये जिंकलो तर जिंकलो आणि हरलो तर गेले.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, असं होणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

असंच होतं नाही आपण २४ करोड रुपये खेळायला गेलो जुगार खेळायला गेलो असं आहे सस्केस झालं तर चांगलं नाही झालं तर २४ करोड रुपये गेले.

**सुरेश वाकोडे :-**

याच्यामध्ये टेक्नॉलॉजी करीता तज्ञ लोकांना दाखवलेली आहे त्यामुळे पाण्याची क्लॉलिटी ही चांगली येणार आहे आणि शासनाचा रिफर्म पण आहे की हे करणं बंधनकारक आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याकरीता शासनाकडुन आपल्यासाठी काहीतरी सबसिडी आहे का? आपण पूर्नवापर करतो ते पण सिव्हरेजच्या पाण्याचा.

**सुरेश वाकोडे :-**

ते रीफर्म आहे आपल्याला ते करणं बंधनकारक आहे पाणी युज करावा बसं.

**प्र. सचिव :-**

प्रकरण २ के खाली एक विषय आलेला आहे मिरारोड पुर्ण साईबाबा नगर येथील तुलीप इमारत ते मे. डेव्हलपर्स एमटीएनएल रोड पर्यंत गटार बांधुन स्लॅब कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे बाबत सर्व सदस्यांची मान्यता असेल तर तो विषय शेवटी घेण्यात येईल.

**अनिल सावंत :-**

विषय घ्यायला हरकत नाही पण प्रशासनाने का प्रस्तावित केला नाही तुमचा प्रॉपर अजेंडावर का नाही आलं?

**प्र. सचिव :-**

प्रशासनाकडुन आताच आलेला आहे.

**अनिल सावंत :-**

२ के खाली प्रकरण हे सदस्याने दिलेलं आहे त्याच्याबाबतीत प्रशासनाची भुमिका काय आहे?

**प्र. सचिव :-**

गोषवारा प्रशासनाने दिलेला आहे.

**दिपक खांबित :-**

आम्ही हा विषय ऑलरेडी दिलेला आहे पण हा विषय पत्रिकेवर घेतला नाही.

**अनिल सावंत :-**

का नाही घेतला?

**दिपक खांबित :-**

माहित नाही पण आम्ही विषय दिलेला

**प्रकरण क्र. ३० :-**

निविदेस मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग) मिरा भाईंदर शहरातील भुयारी गटार योजनेतील सांडपाण्यावरील पूर्नप्रक्रिया शुध्दीकरण केंद्र बांधणे त्याची वितरण व्यवस्था व पुढील तीन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेबाबत.

**ठराव क्र. २९ :-**

मिरा भाईंदर शहरासाठी JNNURM अंतर्गत भुयारी गटार योजनेस केंद्र शासनाने दि. ०६/१२/२००७ रोजी ३३१.४२ कोटी एवढया रक्कमेस मान्यता दिलेली आहे. योजनेमध्ये सांडपाण्याचा पुर्नवापर करणेच्या Reforms चा अंतर्भाव आहे. सांडपाण्यावरील पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर करणेबाबतचा रिफॉर्म शासनाने महानगरपालिकेस बंधनकारक केलेला आहे. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करुन वितरण व्यवस्था अंथरणेच्या रु.२३.७७ कोटी किंमतीच्या कामास निविदा काढणेस मा. महासभेने दि.११/११/२०११ रोजी ठराव क्र. ८० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सांडपाण्याचा पुर्नवापर करणे अशाप्रकारचे काम आजपावेतो कुठेही केलेले नसून कामाचा सुध्दा अनुभव नाही. त्यामुळे सदर कामासाठी तांत्रिक मार्गदर्शन करणेकरिता डॉ. राकेश कुमार, वरीष्ठ शास्त्रज्ञ, NEERI, मुंबई, डॉ.ज्योतीप्रकाश, प्रोफेसर स्थापत्य विभाग, आय.आय.टी. मुंबई, डॉ. आर.एस.जांगीड, प्रोफेसर, स्थापत्य विभाग, आय.आय.टी. मुंबई यांची तांत्रिक सल्लागार समिती नेमण्यात आलेली आहे.

सांडपाण्याचा पुर्नवापर बांधकामासाठी, बगीचा, रस्ते धुणे व सार्वजनिक शौचालयासाठी प्रस्तावित आहे. व पुर्नवापराचा प्रकल्प उभारणी टप्प्याटप्प्याने करण्याच्या दृष्टीने प्रथमतः ५ द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचा पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर प्रकल्प JNNURM अंतर्गत उभारणेच्या कामाच्या रु.११,४५,०१,९५०/- एवढया रक्कमेची निविदा सुचना दि.१८/०२/२०१२ रोजी दै. लोकमत, दै. लोकसत्ता व फ्रिप्रेस जर्नल या वृत्तपत्रात देण्यात आल्या असून e-Tendering द्वारे निविदा मागविण्यात आलेल्या होत्या व सदर निविदा e-Tendering द्वारे भरण्याची अंतिम मुदत दि.१९/०३/२०१२ दुपारी १२.०० वाजेपर्यंत होती. निविदा भरण्याची अंतिम तारीख दोन वेळेस वाढविण्यात येऊन दि. ०७/०४/२०१२ दुपारी १२.०० वाजेपर्यंत करण्यात आली होती. या दरम्यान ३ निविदा आलेल्या होत्या. M/s Thermax Ltd, M/s Kirloskar Brothers Ltd, व M/s Deccan Water Treatment Pvt. Ltd. यांनी निविदा भरलेल्या आहेत. सदरील तीनही निविदाकारांचे Technical Bid दि. १२/०४/२०१२ रोजी उघडण्यात आल्या. योजनेचे सल्लागार M/s Tandon Associates यांनी सदर Technical bid चे evaluation केले आहे. तीनही निविदाकारांचे Technical bid योग्य असून टेकनॉलॉजी व प्रोसेस वर निविदेच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या अनुमती (Apprisal) नंतर तीघांचेही Financial bid उघडण्याची शिफारस योजनेचे सल्लागार M/s Tandon & Associates यांनी केलेली आहे. निविदेच्या तांत्रिक सल्लागार समितीने तीनीही निविदाकारांच्या टेक्नॉलॉजी व प्रोसेस ट्रिटमेंट अभ्यासून त्यांनी प्रस्तावित केलेली टेक्नॉलॉजी व प्रोसेस ट्रिटमेंट योग्य असल्याचा अहवाल दिलेला असून मिरा भाईंदर महानगरपालिकेस निविदेची पुढील कार्यवाही करण्याची शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे सदरील तीनही निविदाकारांचे Financial Bid दि.१४/०५/२०१२ रोजी उघडण्यात आले. त्यांनी सादर केलेले देकार खालीलप्रमाणे आहेत.

| | Cost put to tender –Rs. 11,45,01,950 | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr.No** | **Agency** | **Rate** | **Cost** | **Remarks** |
| 1 | M/s Thermax Ltd | 22 % above | Rs. 13,96,92,379.00 | 1st Lowest |
| 2 | M/s Kirloskar Brothers Ltd. | 49 % above | Rs. 17,06,03,905.50 | 2nd Lowest |
| 3 | M/s Deccan Water Treatment Pvt.Ltd. | 63 % above | Rs. 18,66,38,178.50 | 3rd Lowest |

वरीलप्रमाणे M/s Thermax Ltd, Pune यांचा देकार लघुत्तम असल्याने त्यांना त्यांचा देकाराचे Justification व दर कमी करणेबाबत पत्र दिलेले आहे. त्यानुसार M/s Thermax Ltd, Pune यांनी त्यांच्या देकाराचे Justification सादर केलेले आहे. तसेच याच प्रकारची कामे भविष्यात निघण्याची शक्यता असल्यामुळे त्यांनी त्यांचा अंतिम देकार २२ % वरुन ९.९८ % एवढा कमी केला आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करताना T.T.P. करिता Technology निश्चित नसल्याने वेगवेगळया Technology चे सरासरी दर घेऊन अंदाजपत्रक तयार केले होते. त्यावेळी देखील UF Technology वर आधारित T.T.P. चे दर सर्वात जास्त होते. तसेच महानगरपालिकेकडे T.T.P. साठी फक्त १००० चौ.मी. जागाच उपलब्ध असल्यामुळे एवढया कमी जागेत फक्त UF Technology – membrane वर आधारित T.T.P. च बसू होऊ शकतो. सदर कामासाठी T.T.P. व्यतिरिक्त इतर सर्व बाबींसाठी सन २०१०-११ चे दरसुचीनुसार दर प्रस्तावित केलेले आहेत. सदर अंदाजपत्रक सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार केले आहे. प्रचलीत दरसुचीनुसार (सन २०११-१२) अंदाज पत्रकीय किमंतीत वाढ होत आहे.

योजनेचे सल्लागार M/s Tandon & Associates यांनी M/s Thermax Ltd, Pune यांच्या Financial bid चे Evaluation करुन त्यांनी दिलेला निविदेतील किंमत रु. ११,४५,०१,९५०/- या रक्कमेवर ९.९८ % जास्त दराचा (रु.१२,५९,२९,२४५/-) अंतिम देकार सर्वात कमी व योग्य असल्याचा अहवाल दिला आहे.

निविदेतील किंमत रु. ११,४५,०१,९५०/- या रक्कमेवर ९.९८ % जास्त दराच्या (रु.१२,५९.२९,२४५) M/s Thermax Ltd, Pune यांच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यास शिफारस आहे.

तसेच सदर निविदा बाबत त्वरीत योग्य अटी व शर्तीचा करारनामा करण्यास व ठेकेदारास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच निविदेमधील अटीशर्ती व करारनाम्यातील अटीशर्ती नुसार ठेकेदारास वेळोवेळी देयके प्रदान करण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.३१, मा. आयुक्त साो. यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (आस्थापना विभाग)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, जे.ए. डीजीटल वेब साईट प्रा. लि. ही कंपनी कुठली आहे? ती कंपनी तरी आहे का?

**अनिल सावंत :-**

आपण सध्या जे कॉम्प्युटर ऑपरेटर आहेत त्यांना काय पगार देतो.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, जे.ए. डीजीटल वेब वर्ल्ड प्रा. लि. या कंपनीचं किमान वेतन ज्या निविदा मागविण्यात आल्या होत्या आयुक्तांद्वारा या निविदा काही विशिष्ट पदांसाठी डायरेक्ट कॉन्ट्रेक्ट बेसिसवर माणसं मागवण्याची आता कॉर्पोरेशनमध्ये तुमचं सॉफ्टटेक टेक्नॉलॉजी ने ऑटो डीसीआरचा............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मला फक्त कंपनीचा ॲड्रेस काय आहे वॅट नं आहे का? एस.टी. नं. काय आहे ते सगळं सांगा.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

आहे, मी वॅट नं. मागवला नव्हता आम्ही त्यांना किमान वेतन अधिनियम १९४८ आणि वेतन नियम १९६३ याप्रमाणे आपण त्यांचा परवाना मागवला होता मागील ३ वर्षाचा इंन्कम टॅक्स रीटर्न मागवलं होतं संबंधीत कामाचा अनुभव दाखला मागितला होता चलन आणि डॉक्युमेंट फी मागवली होती चलन आणि डॉक्युमेट फी मागवली होती तर हे सर्व कागद त्यांच्याकडे असल्यामुळे आम्ही त्यांची निविदा मंजुर करुन त्यांना वर्क ऑर्डर दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही अवलोकनात निविदा दिल्या काही हरकत नाही मॅडम पुढच्या वेळी या कंपनीचे सर्व कागदपत्र सह्या ह्या सभेमध्ये आले पाहिजे सचिव साहेब, तुम्ही या कंपनीकडुन जी निविदा मागवलेली आहे त्या निविदांचा सर्व कागदपत्र सभेमध्ये घेऊन या.

**प्र. नगरसचिव :-**

ठिक आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, सध्या आपले जे कॉम्प्युटर ऑपरेटर आहेत त्यांना आपण सॅलरी काय देतो?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

कॉम्प्युटर ऑपरेटर आणि ह्यांच हे नाही आहे याच्यासाठी जे मागवलेलं आहे ती पद आहेत त्याच्यामध्ये वाहन चालक आहेत अचानक आपल्याकडे संप वगैरे होतो किंवा काहीही होतं परिवहन सेवा बंद पडते अशावेळेला.............

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर आणि क्लर्क ते जे आहे त्यांन सध्या आपण पगार काय देतो?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

६,५००/- रुपये देतो.

**अनिल सावंत :-**

त्यांना पाच वर्षे झाली?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

जास्त झाली आहेत.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम म्हणजे त्यांना काम करुन पाच वर्षापेक्षा जास्त झालेली आहे आणि त्यांना आपण साडे सहा हजार रुपये देतो आणि आपण हा नविन स्टाफ मागवतो त्यांना ९,५००/- रुपये ने मागवतो, ही तफावत कशासाठी? एकतर हा रेट जास्त आहे की त्यांना आपण देतो ते कमी आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

आपण पोस्ट मागविलेली ती डाटा एन्ट्री ऑपरेटर कम क्लर्क आहे त्यांनी क्लेरीकल काम करणं सुध्दा अपेक्षित आहे सध्याचे जे कॉम्प्युटर ऑपरेटर आहेत ते केवळ कॉम्प्युटरवरचं काम करतात.

**अनिल सावंत :-**

डाटा एन्ट्री हे कुठे कॉम्प्युटर सोडुन काम करणार आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

डाटा एन्ट्री वाले हे क्लेरीकल वर्क आहे ते सुध्दा करणे अपेक्षित आहे क्लार्कचा पगार ह्याच्यापेक्षा जास्त आहे.

**अनिल सावंत :-**

सध्या जे कॉम्प्युटर ऑपरेटर आहे ते डाटा एन्ट्री पेक्षा कितीतरी पटीने जास्त काम करतात त्यांना टॅक्स डीपार्टमेंटला तुम्ही हलवता, एलबीटी ला हलवता.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

कॉम्प्युटर ऑपरेटर हे क्लेरीकल काम काही करत नाही ते फक्त डाटा एन्ट्री चं काम करतात.

**अनिल सावंत :-**

क्लेरीकल पेक्षा ते जास्त काम करतात पूर्ण आढावा घ्या हा त्यांच्यावर अन्याय आहे आणि ह्या टेंडर मधुन त्या क्लेरीकल पोस्ट मागवल्या त्या आपल्याजवळ ऑलरेडी आहे का?

**मर्लिन डिसा :-**

आता जे आहेत त्यांच्याकडुन क्लेरीकल काम करुन घ्याना.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

तुमची जी भुमिका आहे ती मी आयुक्तांसमोर सांगतो त्याच्यामध्ये या दोन पोस्ट व्यतिरीक्त कॉम्प्युटर ऑपरेटर नाही आहे आणि अचानक काही टोकाची परिस्थीती उद्‌भवून अत्यावश्यक सेवा खंडीत होऊ नये म्हणून वाहन चालक, स्विपर वगैरे अशी आपण पोस्ट मागवुन ठेवलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आता आपल्याकडे महाराष्ट्र शासनाचा जीआर आलेला आहे जे जे आपले कर्मचारी आहेत त्यांना कंपलसरी संगणक शिकले पाहिजे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

हा जी आर फार पुर्वीपासुनच आहे. प्रत्येकाने एमएससीआयटी करणं कंपलसरी आहे आणि ते पास झालेले आहे अगदी माझ्यापासुन आम्हाला प्रत्येकाला एमएससीआयटी होणे बंधनकारक आहे.

**एस. ए. खान :-**

किती लोक पास झाले?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

जवळपास सगळेजण पास झाले जे वय वर्षे ५५ पेक्षा जास्त आहे.............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमचा जो प्रशासन अहवाल आहे त्यामध्ये पण आक्षेप ठेवलेलं आहे की जे आपले क्लर्क आहे त्यांनी संगणक शिकुन महापालिकेच्या कामामध्ये त्यांना सहभागी करायचा नाहीतर त्यांच्यावर कारवाई करावी हा तुमच्या प्रशासन अहवालामध्ये आहे मग का कारवाई होत नाही हे सर्व नविन पदे कशाला मागवता आपल्याकडे माणसं आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

नविन पदे मागविलेली आहेत पण भरलेली नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे जे संगणक चालक आहेत त्या व्यतिरीक्त महानगरपालिका कर्मचारी आहेत जे कॉम्प्युटर ऑपरेटींग करतात जे थोडे सिनीयर पोजिशनला जातात, सिनियर क्लार्क किंवा मुख्य लिपिक अशा पदावर जातात ते कॉम्प्युटर ऑपरेटर जनरली करत नाही पण जे लिपिक पदावर आहे परमनंट पोस्टला आहेत कॉम्प्युटरचं ज्ञान त्यांना असणं अपेक्षित आहे ते त्या प्रमाणे त्याचा वापर देखिल करतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता तुम्ही कुठली कुठली पद घेतली?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

अजुनपर्यंत एकही पद घेतलेलं नाही ते फक्त आपण रेट्स मागविलेले आहे त्याच्यापैकी कोणाचीही नियुक्ती झालेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अंदाजे तुम्ही किती पदे घेणार आहात? रेट मागवले म्हणजे प्रशासनाची काहीतरी मागणी असेल ना

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

पद प्रशासनाकडे मागणी नाही आहे याच्यामध्ये कॉम्प्युटर इजिनियर, हार्डवेअर, कॉम्प्युटर इंजिनियर ऑटो कॅड अँन्ड प्रोग्रॅमर या तीन पदांना आपल्या गरजेमुळे त्वरीत मागवावे लागेल. पुढच्या महिन्याभरामध्ये अन्यथा बाकीची पदे इमिडीएटली लागणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, हे किती वर्षाकरीता आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

ॲज ॲन वेल रीक्वायर म्हणजे समजा त्यांची रिक्वायमेंट...............

**जुबेर इनामदार :-**

हे दर जे त्यांनी दिलेले आहे ते किती वर्षाकरीता आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

एक वर्षाकरीता आहे.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३१ :-**

मा. आयुक्त साो. यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (आस्थापना विभाग)

**ठराव क्र. ३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागामार्फत विविध विभागासाठी वेळोवेळी आवश्यकते नुसार कार्यालयीन कामकाजाकरीता किमान वेतन कायद्यानुसार बाह्य मार्गाने (Out sourcing) कर्मचारी ठेका पद्धतीने पुरवठा करणे. यासाठी दि. २०/१२/२०११ व दि. ३१/१२/२०११ रोजी प्रथम जाहीर वृत्तपत्रात निविदा मागविणे करीता निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. येवून ई-टेंडरिंग प्रणाली नुसार महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरुन कार्यवाही करणेत आली. त्यानुसार ६ निविदा प्राप्त झाल्या परंतु संबंधितानी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्याने निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येऊन दि. ११/०२/२०१२ रोजी फेर निविदा प्रक्रिया ई-टेंडरिंगद्वारे व वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन निविदा मागविल्या असता मुदतीत फक्त एकच निविदा प्राप्त झाली आहे. त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| **Company Name : g a digital web word pvt ltd** | | | |
|---|---|---|---|
| **Price Bid** | | | |
| **Name Of Work – Mira Bhaindar municipal corporation for supplying Out Sourcing employees doing official work** | | | |
| Sr. No. | Particulars | Rate Per Employee/Per Month (In Figure) | Rate Per employee/Per Month (In Words) = WORD (Rate Per Employee/Per Month (In Figure) |
| 1. | Data operator (Computer operator with Clark) | 9500 | NINE THOUSAND FIVE HUNDRED |
| 2. | Computer Enginer (Hardware) | 17000 | SEVENTEEN THOUSAND |
| 3. | Computer Enginer (auto cad) | 22000 | TWENTY – TWO THOUSAND |
| 4. | Computer Enginer (progrmars) | 22000 | TWENTY – TWO THOUSAND |
| 5. | Sweepar | 8000 | EIGHT THOUSAND |

वरील प्रमाणे मे.जी.ए.डिजीटल वेबवर्ड प्रा.लि., मुंबई, यांचे निविदेवरील दर मंजूर केलेले आहेत. त्याअनुषंगाने मे.डी.ए.डिजीटल वेबवर्ड प्रा.लि., यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. तरी वरील कामाची निविदा मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यांत आले.

**सही/-**
**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मर्लिन डिसा :-**

मा. सभापती मॅडम, मला करेक्शन करायचं आहे मी मिटींगला जरा उशिरा आले काही कामात गुंतले होते दि.०८/०५/२०१२ चं जे इतिवृत्तांत आहे त्याच्यामध्ये पेज नं.४ वर मिरारोड पुर्व शांती पार्क रस्ता ते रुची हॉटेल ते एचडीएफसी बँक पर्यंतचा रस्ता मजबुती करुन डांबरीकरण करणे ते गेल्यावेळी ठरावात ३० लाखाचं आहे आता इकडे ३५ लाख केलेलं आहे.

**दिपक खांबित :-**

मॅडम, ठरावात ३५ लाखचं दिलेले आहे.

**मर्लिन डिसा :-**

नाही ३० लाख होते प्लीज चेक करुन घ्या.

**प्र. सचिव :-**

प्रकरण २(के) खाली विषय आलेला आहे त्याचा सदस्यांची मान्यता आहे का?

**शशिकांत भोईर :-**

हो.

**भगवती शर्मा :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड (पूर्व) साईबाबा नगर येथील तुलीप इमारत या भागातील पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे सदर कामी या भागातील भागातील गटारांची लेव्हल घेण्यात आलेली आहे. तुलीप इमारतीकडे सखल भाग असून सदर ठिकाणी नव्याने गटार बांधून या गटाराचा उतार एम.टी.एन.एल. रस्त्यावरील गटारात दिल्यास गटारातील पाण्याचा निचरा होउु शकेल. सदर कामी रू. ३२,८९,५००/- एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेली आहे.

वरील कामी सन २०१२ - १३ या आर्थिक वर्षाच्या "नविन गटारे / नाले" या लेखाशिर्षात पुरेशी तरतूद उपलब्ध असून सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३२ :-**

२(के) अन्वये प्रस्ताव - मिरारोड (पूर्व) साईबाबा नगर येथील तुलीप इमारत ते मेफेअर डेव्लपर्स एम.टी.एन.एल. रोड पर्यंत गटार बांधून स्लॅब कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड (पूर्व) साईबाबा नगर येथील तुलीप इमारत या भागातील पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे सदर कामी या भागातील भागातील गटारांची लेव्हल घेण्यात आलेली आहे. तुलीप इमारतीकडे सखल भाग असून सदर ठिकाणी नव्याने गटार बांधून या गटाराचा उतार एम.टी.एन.एल. रस्त्यावरील गटारात दिल्यास गटारातील पाण्याचा निचरा होउु शकेल. सदर कामी रू. ३२,८९,५००/- एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेली आहे.

वरील कामी सन २०१२ - १३ या आर्थिक वर्षाच्या "नविन गटारे / नाले" या लेखाशिर्षात पुरेशी तरतूद उपलब्ध असून सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा        अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

**सभा संपल्याची वेळ - दुपारी १२.२५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**